सन २०१९-२० साठी महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे या कार्यालयास निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र. ७२/२२-स,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ जुलै, २०१९.

संदर्भ:- **१.** शासन निर्णय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. मरास-२०१५/प्र.क्र.७/२२-स, दि. २१.०२.२०१५.
२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे कार्यालय यांचे पत्र क्र.४ सआ/कायदा व वैधा.काम/म.रा.सह.परि/निधी/५३२/१९, दि. १९.०६.२०१९.
३.शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.८.०७.२०१९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे या कार्यालयाची पुनर्रचना संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. सदर परिषदेवर अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रस्तुत कार्यालयाच्या कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने लागणाऱ्या खर्चाकरिता सन २०१९-२० साठी रु. ११.९० लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर केली आहे. सदर तरतूदीच्या वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रकानुसार ६०% मर्यादित रक्कम म्हणजेच रु. ७.१४ लाख इतका निधी सदर संस्थेस अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे या कार्यालयाचा कार्यालयीन खर्च भागविण्यासाठी सन २०१९-२० साठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु. ११.९० लाख इतक्या तरतुदीमधून ६०% म्हणजेच रु. ७.१४ लाख इतका निधी महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेस संस्थेस या द्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. उपरोक्त बाबीसाठी होणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षात खालील लेखाशिर्षाखाली मंजूर व उपलब्ध असलेल्या आर्थिक तरतुदीमधून भागविण्यात यावा:-

मागणी क्र. व्ही-२,
मुख्य/गौण/उपशिर्ष २४२५, सहकार
००-सहकार १९५ सहकारी संस्थांना सहाय्य (०१) सहकारी संस्थांना अर्थसहाय्य
(१)(०१)महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेला सहाय्य (२४२५ २३९१) (अनिवार्य)
३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)

३. या शासन निर्णयान्वये मंजुर करण्यात आलेली रक्कम रुपये ७.१४ लाख (रुपये सात लाख चौदा हजार फक्त) महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे या कार्यालयास आयुक्त कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यामार्फत वितरित करण्यात यावी व यासाठी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील लागू असलेल्या अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार पुढील बाबींची पूर्तता झालेली आहे:-

१) सन २०१९-२० करीता अर्थसंकल्पित केलेल्या मंजूर निधी रु.११.९० लाख इतका आहे.

२) संक्षिप्त देयके प्रलंबित नाहीत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०७१७१७१०१६९२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJU KALLUJI NARPANDE

Digitally signed by RAJU KALLUJI NARPANDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=445c05397d3e5fac583c028b06de2a1fa2b53743e982f5c31c9f3ffb560b0c16, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f8faa195025519ecce143f48fe16b8572d279b7779146441b412b267fb25acd8, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJU KALLUJI NARPANDE
Date: 2019.07.17 17:19:47 +05'30'

(राजू नरपांडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
३. महालेखापाल, (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
४. महालेखापाल, (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे,
६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
९. वित्त विभाग (व्यय-२) व अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई,
१०.अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
११.निवड नस्ती (२२-स).